पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **११**

**सभावृत्तांत**

दिनांक – **०९/०१/२०२०** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०९/०१/२०२०** रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.गोफणे अनुराधा देविदास
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.साधना अंकुश मळेकर
६. मा.पवळे सुमनताई मधुकर
७. मा.कदम निकिता अर्जुन

या शिवाय मा.उल्हास जगताप – सहा.आयुक्त(नावियो) , मा.जागडे – प्र.नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्रमांक २) महिला बचतगटांना मंजूर बँकेकडील कर्ज रकमेवरील व्याज मनपा मार्फत अदा करणेबाबत.- मा.सुजाता पालांडे, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव.

-----------

दिनांक **२६/१२/२०१९** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०९/०१/२०२० विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०२/कावि/०२/२०२०, दि.०३/०१/२०२०

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.१३ दि.२८/११/२०१९ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.६००५ दि.११/१२/२०१९ अन्वये पवनाथडी जत्रा सन २०१९-२० चे आयोजन जानेवारी २०२० मध्ये पहिल्या अथवा दुस-या आठवडयामध्ये एच.ए.मैदान, पिंपरी/पी.डब्ल्यु.डी.मैदान, सांगवी येथे करण्यात मान्यता देण्यात आली आहे. मा.महापौर आणि मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी पवनाथडी जत्रा २०१९-२० चे आयोजन पी.डब्ल्यु.डी.मैदान, सांगवी येथे दि.१८/०२/२०२० ते दि.२१/०२/२०२० या कालावधीत करणेबाबत पत्रान्वये कळविले आहे. तरी यापुर्वीच्या ठरावामध्ये अंशत: बदल करुन त्यानुसार पवानाथडी जत्रा २०१९-२० चे आयोजन पी डब्ल्युडी मैदान, सांगवी येथे दि.१८/०२/२०२० ते दि.२१/०२/२०२० या कालावधीत आयोजन करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहत ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०९/०१/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सुमनताई पवळे

मा.सुजाता पालांडे, मा.सुमनताई पवळे यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे

महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये महिला बचतगटांना अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे. तथापि, अनुदान एकदा दीड वर्षानंतर आणि तद्दनंतर दहा वर्षानंतर देण्यात येत असल्याने बचतगट बंद होण्याचे प्रमाण अधिक आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील पूर्वीच्या महिला **‘ बचतगट संगोपन ’** कार्यक्रमाच्या धर्तीवर बॅंकांमार्फत बचतगटांना अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु केल्यास महिला आर्थिक दृष्टया सक्षम होवून बचतगट नियमितपणे सुरु राहतील व महापालिकेचे विविध उपक्रम महिला बचतगटांच्या माध्यमातून गरजू व्यक्तींपर्यंत पोचविणे शक्य होईल. तरी सध्या महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत १२०० महिला बचतगटांकरिता ‘मिशन स्वालंबन’ हा उपक्रम सुरु करणेत आला आहे. याच उपक्रमा अंतर्गत जे महिला बचतगट किमान एक वर्षापासून कार्यरत आहेत. अशा महिला बचतगटांकरिता आणि माविम मार्फत पुन:र्जिवित करण्यात येणा-या १२०० महिला बचतगटांकरिता खालीलप्रमाणे योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेचे नाव – '**मिशन स्वावलंबन**'** उपक्रमांतर्गत महिला बचतगटांनी बॅकांमार्फत घेतलेल्या कर्ज रकमेवरील व्याज मनपामार्फत अदा करणेबाबत.

**योजनेचे स्वरुप –** १) महापालिका क्षेत्रांतर्गत किमान एक वर्ष कार्यरत असलेला महिला बचतगट या योजनेकरिता पात्र राहिल.

२) सदर योजनेअंतर्गत महिला बचतगटास खालीलप्रमाणे व्याजाच्या रकमेच्या प्रमाणात अर्थसहाय्य अदा करण्यात येईल.

अ) एक वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचतगटास र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) कर्ज रकमेच्या मर्यादेत बँकेकडील कर्ज घेतल्यानंतर आणि कर्ज रकमेची नियमित परतफेड झाल्यानंतर एक वर्षाच्या व्याजाची रक्कम मनपा मार्फत बँकेकडे अदा करण्यात येईल.

ब) दोन वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचतगटास र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) कर्ज रकमेच्या मर्यादेत बँकेकडील कर्ज घेतल्यानंतर आणि कर्ज रकमेची नियमित परतफेड झाल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या शेवटी याप्रमाणे दोन वर्षाच्या व्याजाची रक्कम मनपामार्फत बँकेकडे अदा करण्यात येईल.

क) तीन वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचतगटास र.रु.३,००,०००/-(अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) कर्ज रकमेच्या मर्यादेत बँकेकडील कर्ज घेतल्यानंतर आणि कर्ज रकमेची नियमित परतफेड झाल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या शेवटी याप्रमाणे तीन वर्षाच्या कालावधीत व्याजाची रक्कम मनपामार्फत बँकेकड अदा करण्यात येईल.

ड) चार वर्ष पूर्ण झालेल्या महिल्या बचतगटास र.रु.४,००,०००/-(अक्षरी र.रु.चार लाख फक्त) कर्ज रकमेच्या मर्यादेत बँकेकडील कर्ज घेतल्यानंतर आणि कर्ज रकमेची नियमित परतफेड झाल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या शेवटी याप्रमाणे चार वर्षाच्या व्याजाची रक्कम मनपामार्फत बँकेकडे अदा करण्यात येईल.

इ) पाच वर्ष पूर्ण झालेला महिला बचतगटास र.रु.५,००,०००/-( अक्षरी र. रु. पाच लाख फक्त) कर्ज रकमेच्या मर्यादेत कर्ज रकमेची नियमित परतफेड झाल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या शेवटी याप्रमाणे पाच वर्षाच्या व्याजाची रक्कम मनपा मार्फत बँकेकडे अदा करण्यात येईल.

३) सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँका उदा. कॅनरा बँक, इंडीयन बँक, बँक ऑफ महाराष्ट्, बँक ऑफ बडौदा इत्यादि तसेच सर्व मल्टी स्टेट शेडयुल्ड बँका, एल.आय.सी, आय.डी.बी.आय बँक इत्यादि मार्फत कर्ज घेतलेल्या बचतगटांनाच या योजनेअंतर्गत मनपा मार्फत त्या टप्प्याकरिता देय असलेली व्याजाची रक्कम देय राहील.

४) वार्षिक १२% व्याजदर विचारात घेवून व्याजाची रक्कम महानगरपालिकेमार्फत बचतगटाचे नावे थेट बँकेच्या खात्यावर ECS द्वारे बँकेकडील अहवाल प्राप्त झालेनंतर जमा करण्यात येईल.

५) वार्षिक १२% पेक्षा अधिक व्याजदराने कर्ज घेतलेले असल्यास अधिकच्या व्याजाची रक्कम महिला बचतगटाने भरणे आवश्यक राहील. त्याची मनपाची जबाबदारी असणार नाही.

६) या योजनेअंतर्गत विविध राष्ट्रीयकृत बँका / मल्टीस्टेट शेडयुल्ड बँका / एल आय सी – आय डी बी आय बँक इत्यादिमार्फत कर्ज घेणेकरिता नाबार्डच्या धर्तीवर महिला बचतगटांचा प्रगती अहवाल बँकेकडे सादर करणे आवश्यक राहील. बँकेडील कर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर या योजनेकरिता सदर महिला बचत गट पात्र राहील.

७) या योजनेअंतर्गत व्याजाचा लाभ घेण्याकरिता महिला बचतगटाने कर्ज रकमेची परतफेड नियमितपणे करणे आवश्यक राहील. याकरिता मार्गदर्शन करणेकरिता महानगरपालिकेमार्फत स्वयंसेवी संस्था अथवा महिला आर्थिक विकास महामंडळाचे धर्तीवर CMRC(Community Managed Resource Centre) च्या धर्तीवर यंत्रणा निर्माण करुन त्यांचेमार्फत महिला बचतगटांना सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. उदा. बचतगटांचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे, बँकांचे व्यवहार नियमित करणे करिता मार्गदर्शन करणे इत्यादि.

८) या योजनेअंतर्गत एका वर्षात जास्तीत तीन हप्ते भरण्यास विलंब झाला आणि त्याबाबतची कारणे बँकेने मान्य केली असल्यास असा बचतगट व्याजाची रक्कम मिळण्यास पात्र राहील.

तथापि, एका वर्षात तीन पेक्षा अधिक थकीत हप्ते असलेला महिला बचतगट या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र असणार नाही. अशा परिस्थितीत सदर संपूर्ण व्याजाची रक्कम भरणेची बचतगटाची जबाबदारी राहील.

०९) एका टप्प्यातील कर्ज रकमेची परतफेड झाल्यानंतर त्या नंतरच्या पुढील टप्प्यावरील कर्ज रकमेकरिता आणि त्यावरील व्याजाच्या रकमेकरीता महिला बचतगट पात्र राहील.
वर नमूद केलेनुसार टप्पा - टप्पाने अर्थ सहाय्य मिळणेकामी बचतगट पात्र राहील. तसेच एकूण १५ वर्षाच्या कालावधीत जास्तीत जास्त् र.रु.२,५०,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख पन्नास हजार फक्त) च्या मर्यादेत व्याजाची रक्कम मिळण्यास महिला बचतगट पात्र राहील.

१०) या योजनेच्या अटी व शर्ती याबाबत योग्य ते बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी -१८ यांना राहील.

यांप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मा.महिला व बाल कल्याण समितीस प्राप्त अधिकारांअंतर्गत मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१८/२०२०
दिनांक : १३/०१/२०२०



**प्र.नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.